ePaper
दिल्लीत रात्री अमित शाह, शिंदे - फडणवीसांमध्ये खलबतं



| वर्ष - 6 | अंक - 241 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- आंतरधर्मीय विवाहांसाठीच्या समितीला न्यायालयात आव्हान देणार-तैहसीन पुनावाला
- नाशिक फाटा ते चाकणपर्यंत आता 'मेट्रो निओ' धावणार!
- सीमाप्रश्नी सहा मंत्र्यांची समिती गठीत

www.mahaenews.com | ।गुरुवार।दिनांक 15डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# जलपर्णीचा महाराक्षस?

## पवना, मुळा, इंद्रायणी नदीतील स्थिती : सोसायटी फेडरेशनची आक्रमक भूमिका

।पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



शहरातील इंद्रायणी, पवना, आणि मुळा या नद्यांच्या पात्रातील जलपर्णी काढणे बाबत व विविध कंपन्यांचे केमिकल मिश्रीत पाणी या नदीमध्ये सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करावी, अशी मागणी चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी केली आहे. याबाबत महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या इंद्रायणी, पवना व मुळा या नद्यांच्या पात्राणांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात जकपर्णी वाढलेली आहे. त्यामुळे तिथे खूप मोठ्या प्रमाणात डासांची पैदास होत आहे.

तसेच नुकतेच पुणे शहरात झिका या डासांपासून होणाऱ्या भयंकर आजाराचे आपल्या शेजारील शहरात रुग्ण सापडले आहेत. झिका हा आजार स्वछ साठलेल्या पाण्यात पैदास होणाऱ्या एडिस इजिप्ती या डासाच्या चावल्याने होणारा आजार आहे आणि या डासाची पैदास प्रामुख्याने या जलपर्णी असणाऱ्या नदी प्रवाहात होते. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचा विषय असल्याने या तिन्ही नद्यांमधील जलपर्णी ताबडतोब काढण्याची कार्यवाही करण्यात यावी. अन्यथा झिका हा आजार मोठ्या प्रमाणात पसरण्याची शक्यता आहे.

तसेच या तिनी नद्यांच्या आजूबाजूच्या कंपन्या व कारखान्यांमधून निर्माण होणारे केमिकलयुक्त पाणी या नद्यांच्या पात्रात सोडले जाते. त्यामुळे या नद्यांचे खूप मोठ्या प्रमाणात पाणी प्रदूषित होत आहे. तरी संबंधित कंपन्या व कारखाने यांच्यावर कारवाई करावी व हे पाणी सोडणे बंद करण्यास सांगावे आणि नद्यांचे पावित्र्या अबाधीत राखावे, अशी मागणीही सोसायटी फडरेशनच्या वतीने करण्यात आली आहे.

> जलपर्णी काढण्याबाबत प्रशासनाला निवेदन दिले आहे. स्वच्छ पिंपरी-चिंचवडची मोहीम शहरात प्रभावीपणे राबवली जात आहे. मात्र, नदीसंवर्धन आणि पुनरुज्जीवनासाठी पुढाकार घेतला पाहिजे. कंपन्यांचे रसायणमिश्रीत सांडपाणी मोठ्या प्रमाणात नद्यांमध्ये मिसळत आहे. त्यामुळे नद्याचे अस्थित्वच धोक्यात येत आहे. यावर तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षीत आहे.
>
> - संजीवन सांगळे, अध्यक्ष, चिखली-मोशी- पिंपरी-चिंचवड सोसायटी फेडरेशन.

# 'रेडझोन'चा प्रस्ताव तात्काळ रद्द करा!

## खासदार श्रीरंग बारणे यांची मागणी : लोकसभा अधिवेशनात लक्ष वेधले

।पिंपरी-चिंचवड ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।



देहूरोड दारूगोळा कारखान्याच्या संरक्षित क्षेत्राची (रेडझोन) वाढवलेली 2,000 यार्डांपर्यंतची हद्द कमी करण्यासाठी गठीत केलेल्या समितीच्या सदस्यांनी स्थानिक लोकांचा कोणताही विचार न करता वेग-वेगळी मते दिली आहेत. त्यानुसार 2,000 यार्डांपर्यंतची हद्द कायम करण्याचा निर्णय संरक्षण विभागाने घेतला असल्याची माहिती मिळाली आहे. 2,000 यार्डांपर्यंत हद्द केल्यास निम्मे पिंपरी-चिंचवड शहर 'रेडझोन' बाधित होईल. त्यामुळे 2,000 यार्ड 'रेडझोन'ची हद्द कायम करण्याचा प्रस्तावित निर्णय तत्काळ रद्द करावा. स्थानिक लोकप्रतिनिधी, राज्य सरकार यांची एकत्रित बैठक घ्यावी. चर्चा करुनच पुढील कारवाई करावी अशी जोरदार मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली.

खासदार बारणे म्हणाले की, मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड दारूगोळा कारखान्यात संरक्षण विभागासाठी 1982 पासून पायरो टेक्नोलॉजी, जैसे 16 एमएम, 155 एमएम की स्मोग आणि सैनिकांसाठीची महत्वाची यंत्रसामग्री, सिग्नलिंग यंत्रे निर्माण केली जातात. या कारखान्यात अति स्फोटके निर्माण केली जात नाहीत. या भागाला जोडून संरक्षण विभागाच्याच इमारतींसह तेथील अधिकाऱ्यांची निवासस्थाने, कार्यालय, शाळा, रुग्णालये, देहूरोड कँटोन्मेंट बोर्डाचे कार्यालय, पिंपरी-चिंचवड महापालिका, तळवडे आयटी पार्क, पीएमआरडीएचे क्षेत्र आहे. या भागात सुमारे 5 ते 6 लाख लोकांचे वास्तव्य असून महापालिका, पीएमआरडीए, देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाने अनेक गृहप्रकल्पांना मान्यता दिली आहे. अनेक वर्षांपासून या भागात मोठ-मोठ्या इमारती असून लोकांचे वास्तव्य आहे. या भागात रस्ते, पाणी, वीज या सुविधा दिल्या आहेत. संपूर्ण भाग संरक्षण विभागाचाही नाही.

त्यानुसार 2 हजार यार्ड हद्द करण्याचा निर्णय संरक्षण विभागाने घेतला असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी तातडीने हस्तक्षेप करावा. 2,000 हजार यार्डांपर्यंत हद्द निश्चित केल्यास अर्धे पिंपरी-चिंचवड शहर, अनेक रहिवाशी इमारती 'रेडझोन' हद्दीत येतील. त्यामुळे भविष्यात या भागात कोणताही विकास होणार नाही. मागील अनेक वर्षांपासून हद्द कमी करण्याची मागणी करणाऱ्या लोकांवर मोठा अन्याय होईल. त्यामुळे 2,000 हजार यार्डांपर्यंची कायम करण्यात येणारा हद्दवाढीचा प्रस्तावित निर्णय तत्काळ रद्द करावा, अशी आग्रही मागणी खासदार बारणे यांनी संसदेत केली.

### स्थानिक लोकांना विश्वासात घेतले नाही...

सुरुवातीला संरक्षण विभागाच्या सीमाभिंतीपासून 'रेडझोन'ची हद्द 600 यार्डांपर्यंतच होती. परंतु, 2013 मध्ये ती अचानक 2,000 यार्डांपर्यंत वाढविण्यात आली. वाढवलेली हद्द कमी करण्याची मागणी स्थानिक नागरिक अनेक वर्षांपासून करत आहे. यासाठी मी सातत्याने पाठपुरावा करत आहे. 2, 000 हजार वरुन 500 यार्ड हद्द करण्याबाबत तत्कालीन संरक्षण मंत्री दिवंगत मनोहर पर्रीकर, निर्मला सीतारमण, आताचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्यासोबत अनेक वेळा बैठका झाल्या आहेत. त्यानंतर संरक्षण विभागाने एक समिती गठीत केली होती. समितीच्या सदस्यांनी स्थानिक लोकांचा कोणताही विचार न करता वेग-वेगळी मते दिली आहेत.

# आंतरधर्मीय विवाहांसाठीच्या समितीला न्यायालयात आव्हान देणार : तैहसीन पुनावाला

पुणे
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहात समन्वयासाठी राज्य सरकारने नेमलेल्या समितीमुळे राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत आहे. त्यामुळे या समितीच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार आहे, अशी माहिती



सामाजिक कार्यकर्ते आणि उद्योजक तैहसीन पुनावाला यांनी बुधवारी दिली.

श्रद्धा वालकर हत्याकांडाच्या



पार्श्वभूमीवर राज्य सरकारने महिला व बालविकास मंत्री मंगलप्रसाद लोढा यांच्या नेतृत्वाखाली 13 जणांची समन्वय समिती स्थापन करण्याची घोषणा मंगळवारी केली. ही समिती आंतरधर्मीय, आंतरजातीय विवाह करणाऱ्या मुलींची तसेच त्यांच्या कुटुंबीयांची माहिती घेऊन त्यांच्यात समन्वय घडवून आणेल, असे राज्य सरकारने म्हटले आहे.

याबाबत पूनावाला म्हणाले, 'राज्यघटनेतील कलमांनुसार प्रत्येक नागरिकाला स्वतःचे आयुष्य कसे जगावे याचे स्वातंत्र्य आहे. तसेच कोणताही धर्म स्वीकारण्याची मोकळीक आहे. राज्य सरकारच्या समितीमुळे या अधिकारांवर गदा येत असून समानतेच्या तत्वालाही हरताळ फासला जात आहे. त्यामुळे ही समिती बेकायदेशीर आहे. नागरिकांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन होत असल्यामुळे समितीच्या रचनेला उच्च न्यायालयात आव्हान देणार आहे.'

महिलांची सुरक्षितता जोपासण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्याबद्दल पोलीस खात्यातही संवेदनशीलता निर्माण करण्याची गरज आहे.

कायद्यांच्या काटेकोर अंमलबजावणीकडे लक्ष देण्याऐवजी राज्य सरकार राज्यघटनेने नागरिकांना दिलेल्या अधिकारांचे उल्लंघन करीत आहे. त्यामुळेच समितीची अधिसूचना निघाल्यावर तिच्या विरोधात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली जाईल, असे पुनावाला यांनी स्पष्ट केले आहे.

# जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केली विजयस्तंभ परिसराची पाहणी!

वाघोली
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पेरणे फाटा येथे एक जानेवारी 2023 रोजी होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख यांनी आढावा घेतला. तसेच विजयस्तंभ परिसरास भेट देऊन पाहणी केली. देशभरातील अनुयायी एक जानेवारी रोजी कोरेगाव भीमा येथे अभिवादन करण्यासाठी येतात. त्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक नियोजन करावे. त्यासाठी प्रत्येक विभागाने समन्वयक अधिकारी नेमावा. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही समस्या येणार नाही याची दक्षता घ्यावी व नियोजित वेळेत आवश्यक



काम पूर्ण करावे असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

विजयस्तंभ परिसरात नियोजनाशी संबंधित अधिकाऱ्यांची त्यांनी बैठक घेतली. आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, जिल्हा परिषद, पीएमपीएमएल, अग्निशमन, सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग आदी विविध विभागांच्या नियोजनाचा आढावा घेतला. तसेच वाहनतळ व इतर व्यवस्थेसंबंधी ठिकाणांना भेट देऊन तेथील तयारीचा आढावा घेतला. यावेळी पोलीस सहआयुक्त संदीप कर्णिक, पोलीस अधीक्षक अंकित गोयल, अपर पोलीस आयुक्त नामदेव चव्हाण, उपविभागीय अधिकारी संजय आसवले, तहसीलदार किरण सुरवसे, गट विकास अधिकारी प्रशांत शिर्के, लोणीकंदचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन पवार, विजयस्तंभ स्मारक समितीचे पदधिकारी उपस्थित होते.

### शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणी

# विशेष सरकारी वकिलांच्या नियुक्तीला टाळाटाळ




**पुणे:** शिवाजीराव भोसले सहकारी बँक अवसायनात काढण्यात आल्यानंतर पाच लाखांपर्यंतच्या बहुतांश ठेवीदारांना ठेव विमा महामंडळाकडून पैसे मिळाले आहेत. मात्र, पाच लाखांपुढील १८१५ ठेवीदारांचे पैसे मिळण्यासाठी आणि बँक गैरव्यवहारातील जबाबदार व्यक्तींवरील पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी विद्यमान राज्य सरकारने विशेष सरकारी वकिलांची नेमणूक अद्याप केलेली नाही. राज्य सरकारकडून जाणीवपूर्वक ही नियुक्ती करण्यात येत नसल्याचा आरोप शिवाजीराव भोसले बँक ठेवीदार कृती समितीने बुधवारी पत्रकार परिषदेत केला. ही बँक अवसायनात काढण्यात आल्यापासून आतापर्यंत ९४ हजार ठेवीदारांपैकी ९२ हजार ठेवीदारांना ठेव विमा महामंडळाकडून (डिपॉझिट इन्शुरन्स अँड क्रेडिट गॅरन्टी कॉर्पोरेशन – डीआयसीजीसी) २७२ कोटी रुपये पाच लाखांपर्यंतच्या ठेवीदारांना देण्यात आले आहेत. मात्र, अद्यापही १८१५ ठेवीदारांच्या २०० कोटी रुपयांच्या ठेवी परत मिळालेल्या नाहीत. त्यामुळे भोसले आणि बँकेच्या संचालक मंडळाच्या मालमत्तांचा लिलाव करण्याची कारवाई होण्याची गरज आहे. मात्र, राज्य सरकारने विशेष सरकारी वकील नेमलेला नाही.

# माओवादी संघटनेशी संबंधीत अरुण भेलकेला आठ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा

हडपसर ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

बंदी घातलेल्या माओवादी संघटनेचे सक्रिय सदस्य असल्याच्या संशयावरुन अटक करण्यात आलेल्या अरुण भेलके याला विशेष न्यायाधीश एस. आर .नावंदर यांनी आठ वर्षे सक्तमजुरी आणि ४२ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली.



चाकण परिसरातून २०१४ मध्ये अरुण भेलके उर्फ आदित्य पाटील आणि त्याची पत्नी कांचन उर्फ सोनाली पाटील (वय ३३) यांना दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) अटक केली होती. भेलके दाम्पत्य मूळचे चंद्रपूरचे आहे. दोघांच्या विरोधात बेकायदा प्रतिबंधक हालचाल (यूएपीए) कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात आली होती. तेव्हापासून भेलके येरवडा कारागृहात न्यायालयीन कोठडीत आहे. त्याची पत्नी कांचन हिचा दीर्घ आजाराने ससून रुग्णालयात मृत्यू झाला. कांचनला हृदयविकाराचा त्रास होता.

पुणे, मुंबई शहरात दोघे जण माओवादी विचारांचा प्रसार करत होते. बंदी घातलेल्या माओवादी संघटनेच्या कामात शहरी भागातील तरुणांना ओढण्याचे काम भेलके दाम्पत्याकडे सोपविण्यात आल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. मुंबईत वास्तव्यास असताना अरुण भेलके एल्गार प्रकरणातील आरोपी सुधीर ढवळे यांच्या रिपब्लिकन पँथर्स या संघटनेच्या संपर्कात आला. त्यानंतर अरुण भेलके आणि त्याची पत्नी कांचन यांनी आदित्य पाटील आणि सोनाली पाटील यांनी बनावट नावाने पॅनकार्ड मिळवल्याचे तपासात उघडकीस आले होते.

भेलके माओवादी नेते दीपक उर्फ मिलिंद तेलतुंबडे यांच्या संपर्कात होता. माओवादी चळवळीत तो सक्रिय होता. शहरी भागात माओवादी चळवळीचा प्रसार करण्याचे काम भेलके आणि त्याची पत्नी करत होते. जंगलात त्यांची आणि माझी भेट झाली. त्या वेळी तेथे तेलतुंबडे होते, अशी साक्ष शरणागती पत्कारलेला नक्षलवादी कृष्णा दोरपटे याने न्यायालयात दिली होती. दलित संघटनांना माओवादी चळवळीत यावे, यासाठी तो प्रयत्न करत होता, असे दोरपटे याने न्यायालयात सांगितले होते. या खटल्यात सरकार पक्षाकडून सरकारी वकील अॅड. उज्वला पवार यांनी बाजू मांडली. भेलके याच्या वतीने अॅड. रोहन नहार यांनी बाजू मांडली.

# नाशिक फाटा ते चाकणपर्यंत 'मेट्रो निओ' धावणार!

## आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पाठपुराव्याला यश: 'डीपीआर' तयार करण्याचे काम सुरू

**पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज ।**

**हिंजवडी ते चाकणपर्यंत मेट्रो धावावी आणि आयटी तसेच औद्योगिक वसाहतीत विविध कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या नागरिकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सहजपणे उपलब्ध व्हावी यासाठी भाजप आमदार लक्ष्मण जगताप हे केंद्र आणि राज्य सरकार तसेच महामेट्रोकडे सातत्याने पत्रव्यवहार करत आहेत. त्यांच्या या पत्रव्यवहाराला आणि पाठपुराव्याला अखेर यश आले असून, महामेट्रोने पहिल्या टप्प्यात नाशिक फाटा ते चाकणपर्यंत मेट्रोऐवजी हायस्पीड टायरबेस्ड एलिव्हेटेड मेट्रो निओ मार्ग उभारण्याचा निर्णय घेतला आहे. या मेट्रो निओ मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येत असून, तो लवकरच पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर करणार असल्याचे महामेट्रोने आमदार लक्ष्मण जगताप यांना पत्र पाठवून कळवले आहे.**





पिंपरी-चिंचवडच्या वाढत्या लोकसंख्येमुळे तसेच शहर आणि आसपासच्या ग्रामीण भागात वाढणाऱ्या औद्योगिकीकरणामुळे भविष्यात सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न अधिक जटिल होऊ नये म्हणून आतापासूनच शहरात मेट्रोचे जाळे निर्माण करण्यासाठी आमदार लक्ष्मण जगताप प्रयत्नशील आहेत. त्यांच्या पाठपुराव्यामुळेच १० ते १५ वर्षे रखडलेल्या पिंपरी-चिंचवड ते पुणे मेट्रो मार्गाला गती मिळाली होती. केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील तत्कालिन देवेंद्र फडणवीस सरकारने मेट्रो मार्ग उभारण्याच्या प्रशासकीय कामाला गती दिल्यामुळे आज पिंपरी-चिंचवडकरांचे मेट्रोमध्ये बसण्याचे स्वप्न साकार झाले आहे. आता पिंपरी-चिंचवड महानगरपालिका भवन ते निगडीपर्यंत तसेच हिंजवडी ते चाकणपर्यंत मेट्रोचा मार्ग तयार करण्यासाठी आमदार लक्ष्मण जगताप हे केंद्र व राज्य सरकार तसेच मेट्रो मार्गाची उभारणी करणाऱ्या महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड अर्थात महामेट्रोकडे सातत्याने पाठपुरावा करत आहेत.

त्यासाठी आमदार लक्ष्मण जगताप यांनी केंद्र व राज्य सरकार तसेच महामेट्रोसोबत अनेकदा पत्रव्यवहार केला आहे. तसेच अनेकदा स्मरणपत्रे पाठवून पिंपरी ते निगडी आणि हिंजवडी ते चाकणपर्यंतच्या मेट्रोला मंजुरी देण्याची मागणी केली आहे. त्यांच्या या पत्रव्यवहार आणि पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. महामेट्रोने आमदार लक्ष्मण जगताप यांना पत्र पाठवून हिंजवडी ते चाकण मार्गावरील नाशिक फाटा ते चाकणपर्यंत (एकूण २३ किलोमीटर) मेट्रोऐवजी मेट्रो निओ मार्ग उभारण्याचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत असल्याचे कळवले आहे. हा अहवाल लवकरच पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे सादर केला जाणार असल्याचे पत्रात नमूद केले आहे. नाशिक फाटा ते भोसरीपर्यंतची एचसीएमटीआर मार्गिका ही मेट्रो निओ मार्गिकेचा भाग असेल, असेही महामेट्रोने पत्रात स्पष्ट केले आहे.

### काय आहे मेट्रो निओ...

**भारतातील दुसऱ्या किंवा तिसऱ्या श्रेणीतील शहरात गर्दीच्या वेळी तासाला साधारणपणे ५ ते १५ हजार लोक प्रवास करतात. ही प्रवासी संख्या वाहून नेण्याची क्षमता असणारी मेट्रो निओ सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा उपाय आहे. या मेट्रो निओचे कोचेस, सोयीसुविधा, स्टेशन आणि इतर सगळे मेट्रोसारखेच असेल. फक्त मेट्रो निओचे कोचेस इतर मेट्रोप्रमाणे रुळांवर न चालता रबरी टायरवर चालणार आहेत. मेट्रो निओ विजेवर धावणारी तरीही रबरी टायरची चाके असणारी आहे. मेट्रो निओच्या एका कोचमध्ये साधारणतः १८० ते २५० प्रवासी बसू शकतात. मेट्रो निओ एकावेळी तीन कोचेससह धावते. मेट्रो प्रकल्पासाठी येणाऱ्या खर्चापेक्षा मेट्रो निओचा खर्च कमी असल्याने त्याला प्राधान्य दिले जात आहे. मेट्रो निओ एकप्रकारे बससारखीच दिसते.**

---

# राज्याच्या पंचतारांकित विकासगंगेची मुहूर्तमेढ!

## आमदार महेश लांडगे : शिंदे -फडणवीस सरकारचे अभिनंदन

**पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**





विकासगंगेत अकरा तारकांचा समावेश करून राज्याच्या विकासाचे नवे पर्व सुरू करण्याच्या मोदी सरकारच्या ध्यासाला साथ देत महाराष्ट्रात शेतकरी, शिक्षण, रोजगार, उद्योग आणि क्रीडा क्षेत्रासाठी पंचतारांकित कार्यक्रम हाती घेतल्याबद्दल भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे शिंदे-फडणवीस सरकारचे अभिनंदन केले आहे.

प्रगतीला चालना देणारे व समृद्धीची नवी दिशा दाखविणारे निर्णय घेऊन महायुती सरकारने सर्वांगीण विकासाचे महत्वाकांक्षी पाऊल उचलले आहे, असेही लांडगे यांनी म्हटले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, मंगळवारच्या मंत्रिमंडळ बैठकीत महायुती सरकारच्या विकासनीतीची दिशा स्पष्ट झाली असून, ठाकरे सरकारने उलटे फिरविलेले विकासाचे चक्र आता पूर्वपदावर आले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना हाती घेतलेला जलयुक्त शिवार कार्यक्रम शेतकऱ्यांसाठी वरदान ठरला होता. या कार्यक्रमातून ३९ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येऊन पिकांच्या उत्पादनात भरघोस वाढ झाली होती. ठाकरे सरकारने आकसाने बंद केलेली जलयुक्त शिवार योजना शिंदे-फडणवीस सरकारने पुन्हा सुरू करून कृषी क्षेत्राला मोठा दिलासा दिला आहे, असे ते म्हणाले.

येत्या तीन वर्षांत राज्यातील पाच हजार गावे जलसमृद्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासासाठी मनरेगा व अन्य विभागांची सांगड घालून सुविधासंपन्न कुटुंब योजना आखून सरकारने ग्रामीण जनतेच्या हिताची तळमळ दाखवून दिली आहे, असेही आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, विदर्भ, मराठवाडा , नाशिक, पुणे परिसराच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी, ५५ हजार रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या ७० हजार कोटींच्या गुंतवणूक प्रकल्पांना मान्यता देऊन सरकारने राज्याच्या औद्योगिक क्षेत्राला नवी उभारी दिली आहे. ठाकरे सरकारच्या अडीच वर्षांच्या काळात एकही नवा उद्योग राज्यात आला नाहीच, उलट अनेक उद्योगांनी राज्यातून काढता पाय घेतल्याने रोजगार क्षेत्राची झालेली हानी आता झपाट्याने भरून निघेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



"कोविड महामारीचे निमित्त करून ठाकरे सरकारने राज्यातील शिक्षणाचा खेळखंडोबा केल्याने शिक्षणक्षेत्राला आलेली मरगळ महायुती सरकारच्या नव्या निर्णयामुळे झटकली जाणार आहे. राज्यातील सहा हजार शाळा आणि सुमारे १५ हजार तुकड्यांना ११०० कोटी रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय शिंदे-फडणवीस सरकारने घेतल्याने सुमारे ६३ हजार ३३८ शिक्षक-कर्मचाऱ्यांना लाभ होणार आहे. सुमारे २५० शाळांतील ४२ हजार विद्यार्थ्यांकरिता कौशल्य विकास कार्यक्रम आणि होतकरू तरुणांना प्रशासन व्यवस्थेचा अनुभव मिळावा यासाठी पुन्हा सुरू केलेली मुख्यमंत्री फेलोशिप योजना यांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळेल.

**- महेश लांडगे,**
**शहराध्यक्ष तथा आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**

## संपादकीय

# झाकण्यापेक्षा काळोख हटवा

***सरकार, कायदे, विधिमंडळ, धोरण, प्रशासन आणि यातून तयार होते ती व्यवस्था. व्यवस्था या शब्दातच एक प्रकारचा प्रस्थापित भाव आहे. या व्यवस्थेचे गोडवे गाण्यात आणि त्यातून आपण कुठली तरी अमूर्त अशी आकृती तयार केली आहे, असा आपला अविर्भाव असतो. व्यवस्थेच्या रुपाने आपण जगण्याची परिमाणे शोधत असतो. पण या व्यवस्थेच्या लाभधारकांचा विचार करायचा झाल्यास मुळात याचे खरे लाभधारक कोण आहेत, असा प्रश्नही उभा राहतो.***

एखाद्या देशासाठीची किंवा राज्यासाठीची अशी व्यवस्था उभी राहत असताना त्यात नेमका कुणाचा सहभाग असतो? तर, अठरापगड जाती, सर्व प्रकारचे धर्म, पंथ, जात, भाषा अशा कुठल्याही विभागणीतून शिल्लक न राहणारी प्रत्येक व्यक्ती या व्यवस्थेची खरी लाभधारक असायला हवी; पण खरेच तसे असते का? तार्किकार्थाने असेलही कदाचित; पण प्रस्थापितांच्या परिघात घोटाळणारी व्यवस्था समाजातल्या सर्वात खालच्या, तळातल्या व्यक्तीपर्यंत पोहोचत नाही, त्याचा विचार व्हायला हवा. सर्वांना लागू पडेल अशा प्रकारची व्यवस्था स्थापन करण्यासाठी म्हणूनच लोकशाहीच्या सूत्राचा जन्म झाला असावा. पण ती मात्रादेखील नेमकी लागू पडली नाही. त्यातही पुन्हा व्यवस्थेच्या लाभधारकांची वर्गवारीच झाली. त्यामुळे मग श्रीमंत, गरीब, मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय, वंचित असे गट तयार झाले. त्यात जातीपातींचे कोंडाळे आले आणि त्यातून व्यवस्थेत एक प्रकारची अडगळ तयार व्हायला लागली.

व्यवस्थेच्या रंग फासलेल्या गोंडस रुपात जे शोभून दिसत नाही ते या अडगळीत टाकले जाते. एकप्रकारचा विटाळच तो. जे बघायला, दिसायला ओंगळवाणे असते ते झाकून टाकण्याचा हा प्रयत्न. पण जे झाकले जाते ते आणखीन वाकून पाहिले जाते, हे मात्र आपण सपशेल विसरतो. आपल्या जगण्याच्या अंशाचा केवळ गोंडस गोमटा भाग तेवढा जगाला दाखवायचा आणि आपली सरबराई करुन घ्यायची, हे कितपत योग्य आहे? जे स्वर्गतूल्य आहे तेवढेच जिन्नस ताटात वाढायचे आणि ते जिन्नस बनवणारे नरकप्राय जगात राहतात हे लपवायचे का?

भारताकडे जी-२० चे नेतृत्व करण्याची संधी आली आहे. त्यासाठी अवघा देश सज्ज झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी अर्थातच या घडामोडींच्या केंद्रस्थानी आहेत. आंतरराष्ट्रीय पटलावर त्यांनी स्वत:ची अशी वेगळी ओळख निर्माण केली आहे. सहाजिकच भारताच्या नेतृत्त्वात होऊ घातलेल्या जी-२० परिषदेकडे सर्वांचे डोळे लागलेले आहेत. 'वसुधैव कुटुंबकम' हे भारतीय संस्कृतीचे मोठेपण सांगणारी आणि माणसा-माणसातला भेद नष्ट करुन संपूर्ण जग एकत्र आणणारी संज्ञा घेऊन देश या परिषदेचे नेतृत्त्व करतो आहे, ही त्याहीपेक्षा आनंदाची गोष्ट. 'एक पृथ्वी, एक कुटुंब आणि एक भविष्य' असे ब्रीदवाक्य या परिषदेसाठी ठरवण्यात आले आहे.

# आयुर्वेदाचा आभास आणि ॲलोपॅथीचे सत्य






फार्मा उद्योग आपल्या औषधांचा खोटा प्रचार करीत असल्याचा दावा करणारी जाहिरात गेल्या आठवड्यात अनेक वृत्तपत्रांत झळकली आणि वैद्यकविश्वात उलट-सुलट चर्चा सुरू झाली. 'त्या' जाहिरातीमधील मुद्द्यांना खोडणारी भूमिका.. आधुनिक औषधांनी लोकांचे जीवन नरकासमान बनवले आहे असा सलामीचा दावा आहे. आपले जीवन पूर्वीपेक्षा खरोखरच नरकासमान झाले आहे का? आरोग्यसेवांची आणि लशी, पाणी, शौचालये वगैरेंची उपलब्धता, सरासरी आयुर्मान, माता मृत्यू, अर्भक मृत्यू, पर्यावरण असे आरोग्यमान वर्तवणारे सुमारे दोन डझन निकष आहेत. या साऱ्या निकषांवर आपण प्रगतीच केलेली दिसते. ती पुरेशी नाही, संथ आहे वगैरे आक्षेप असू शकतील पण आपण नरकात पोहोचलो आहोत, हा दावा जरा अतीच होतोय आणि त्यामुळे हसूही येतंय.

लोकांना नेहमीच तुम्ही किती रंजलेले, गांजलेले, गरीब बिच्चारे, असा सूर आवडतो. गुरूंनी ही गोष्ट नेमकी हेरली आहे. म्हणूनच त्यांनी, तुमचे जीवन नरकासमान इथून सुरुवात केली आहे. म्हणजे आपोआपच हे तारणहार. ज्योतिषी जसे, 'तू दिलाचा चांगला पण दुनिया वाईट बघ.' अशी सुरुवात करून गिऱ्हाईक खिशात घालतात तद्वतच हे. पुढे ॲलोपॅथी सरसकट खलनायक असून आपली औषधे निर्धोक असल्याचे म्हटले आहे. वस्तुस्थिती अशी आहे, की आयुर्वेदिक औषधे बाजारात येण्यापूर्वी सुरक्षा, परिणामकारकता वगैरे कोणत्याही चाचण्या आवश्यक नसतात! केवळ पारंपरिक वापर हा इष्ट पुरावा मानला जातो. म्हणजे ही एक आंधळी कोशिंबीरच आहे. अशा परिस्थितीत तर असे बेधडक दावे करणे अधिकच धोक्याचे आहे.

ॲलोपॅथी आणि 'साइडइफेक्ट' हे जोडशब्द म्हणून रूढ करण्यात अन्य पॅथीय यशस्वी झाले आहेत. प्रत्येक औषधाला, मग त्याच्या भाळी कोणत्याही पॅथीचा टिळा लावला तरी, काही ना काही सहपरिणाम असतातच. सगळेच सहपरिणाम दुष्ट नसतात. (काही सुष्टही असतात.) प्रामाणिकपणे त्याची नोंद करणे, कारणे शोधणे आणि त्यावर उतारे शोधणे हे ॲलोपॅथीत सतत सुरू असतं. औषध बाजारात येण्यापूर्वी आणि नंतरही निरंतरपणे असा पहारा राखला जातो. म्हणूनच काही वेळा दुष्परिणाम लक्षात येताच, औषधे माघारी घेतली जातात (रीकॉल). असा प्रकार अन्य पॅथीमध्ये घडत नाही. कारण अशी व्यवस्थाच नाही. हे चांगले का वाईट? दुष्परिणाम नाहीत असं सांगितलं जातं त्या मागील सत्य हे की ते तपासलेलेच नाहीत. त्यांची नोंद ठेवायची काहीही व्यवस्थाच नाही. म्हणूनच परिणामकारकता आणि सुरक्षितता या दोन्ही बाबतीत आधुनिक औषधे कित्येक पायऱ्या वरचढ आहेत. असाध्य आणि प्राणघातक आजार बरे करतो, असाही दावा आहे. अगदी याच शब्दांत आहे. अशा आजारांच्या यादीत हार्ट ब्लॉकेज नावाचाही आजार आहे. 'हार्ट ब्लॉकेज' असा कोणता आजारच नाही. हा सामान्य भाषेतला ओबडधोबड शब्द आहे. यात अनेक आजार बसू शकतात, कोरोनरी व्हेसलमध्ये अडथळा, हृदयात रक्ताची गुठळी, हृदयाच्या स्पंदन-तंत्रामध्ये दोष, असे अनेक. म्हणजे तज्ज्ञांनी नेमके समजायचे काय? उत्तर असे की हे तज्ज्ञांसाठी नसून अज्ञांसाठीच आहे. संभाव्य गिऱ्हाइकांसाठी आहे. ज्याने त्याने आपल्या सोयीने अर्थ काढायचा आहे.

भोंगळ भाषा हे इथले ब्रह्मास्त्र आहे. विरोधकांना नामोहरम करण्याची ही खाशी युक्ती आहे. सुसंबद्ध बोलण्याचा काही प्रतिवाद शक्य आहे. असंबद्ध बरळणे असेल तर वाद कसा घालणार? शिवाय इतक्या तऱ्हेतऱ्हेच्या आजारांबद्दल इतके बेधडक दावे केले आहेत की वाचून मती गुंग होऊन जाते. प्रतिवादाला सुरुवात कोठून करावी असा प्रश्न पडतो. आजारांचे वर्गीकरण साध्य आणि असाध्य अशा दोनच पक्षांत करणे हा आणखी एक बुद्धीभ्रम. काही आजार साध्य असतात, काही प्राणघातक असतात, पण बरेचसे अधलेमधले असतात. डायबेटीस, ब्लड प्रेशर, गुडघ्याची झीज हे यातले सर्वपरिचित. यांना 'क्रोनिक मॅनेजेबल डिसीज' म्हणतात.

# हिंसेशी लढा कसा द्यायचा?

**भारतीय संस्कृतीत घर हे सगळ्यात पवित्र आणि सुरक्षित स्थान मानले जाते. त्यामुळे घरातल्या हिंसाचाराची, तणावांची दखल घेऊन कायदा तयार करायला एकविसावं शतक उजाडले. अनेक वर्षांच्या रेट्यामुळे, २००५ मध्ये कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा झाला. मात्र, आजही त्या अंतर्गत न्याय मागण्याचे अत्यल्प आहे. सोप्या भाषेत हा कायदा लोकांपर्यंत पोहोचवण्यात पोलिस, महिला व बालकल्याण विभाग यांना यश आलेले नाही. तसेच, 'चार भिंतीतली गोष्ट', नवरा-बायकोचा मामला ही काही सार्वजनिक गोष्ट नाही, असा समज कायम आहे. त्याशिवाय, हिंसाचाराच्या मुळाशी असलेल्या लिंगभेदभाव करणाऱ्या धारणा कायमच आहेत.**



तक्रारदार महिलांना संरक्षण मिळते. राहत्या घरात राहण्याच्या अधिकार, संरक्षण, पोटगी आणि नुकसानभरपाई मिळण्याची तरतूद या कायद्यात आहे. मात्र, वास्तव गुंतागुंतीचे आहे. एखाद्या महिलेनं केस नोंदवली तर तिचं निराकरण साठ दिवसांत गरजेचं आहे. पण बऱ्याचदा मेट्रोपॉलिटन कोर्टांकडून अंतरिम आदेश यायलाच सहा-सहा महिने लागतात. त्यात हा कायदा सिविल आहे. यात आरोपीला गुन्हेगारी कायद्याने होतो, तसा तुरुंगवास होत नाही. कोर्टाच्या आदेशानंतर पोटगी, भरपाई दिली नाही, तर मात्र तुरुंगवासाची शिक्षा होते. बऱ्याचदा केस दाखल केल्यानंतर भरपाई, पोटगीच्या निर्देशापर्यंत यायलाच कोर्टाला वर्ष, दीड वर्ष लागतं, तोवर पीडित महिलेनं जगायचं कसं? बऱ्याच जणींना घरातून बाहेर काढलेलं असतं. नोकरी नसते. त्यांनी राहायचं कुठे आणि मुलांचं पालनपोषण कसं करायचं? शासनाची शेल्टर होम्स आदर्श स्थितीत नाहीत. त्यांच्यावरही ताण आहे. त्यांना मिळणारं अनुदान अत्यल्प आहे. आम्ही रोज या केसेससाठी कोर्टात खेटे घालणाऱ्या महिला पाहतो, त्यांच्यासोबत लढतो. त्यामुळे त्यांची स्थिती कळते. बहुतांश महिला इतक्या गरीब असतात की कोर्टात येण्या-जाण्याचा खर्च, कागदपत्रे झेरॉक्स करण्याचा खर्चही त्यांना झेपत नाही. शिवाय तारखेला यायचं म्हणजे त्या दिवसाचा रोज बुडतो आणि एवढं सगळं करून निकाल व भरपाई कधी मिळणार, हा प्रश्नच. तोवर कसं जगायचं? म्हणून महिला तक्रार करायला पुढे येत नाहीत. त्यामुळेच, स्वयंसेवी संघटनांची जबाबदारी वाढते.हा प्रश्न साऱ्या समाजाचा व यंत्रणांचा आहे. यंत्रणा यात संवेदनशील होण्याची गरज आहे. आजही नवऱ्यानं मारल्याची तक्रार घेऊन बायका पोलिस ठाण्यात गेल्या तर 'बाई घरचा मामला, घरीच मिटवा. तुमच्या घरच्या मॅटरमध्ये आम्ही काय करणार,...' असं बोलून निराधार बाईची रवानगी पुन्हा हिंसेच्या खाईत केली जाते. अदखलपात्र तक्रारही नोंदवून घेतली जात नाही. महिला त्यांच्याकडे जातात, कारण त्यांना कायद्याची फार माहिती नसते. अशावेळी कायद्यातल्या तरतुदी, महिलांसाठी असलेली संरक्षक अधिकाऱ्याची नेमणूक, त्यांचं ऑफिस, संपर्क हे सारं पोलिसांनी सांगितलं पाहिजे.

केस संरक्षण अधिकाऱ्यांना सांगितली पाहिजे. यासाठी, पोलिसांचे प्रशिक्षण आवश्यक आहे.

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सहा मंत्र्यांची समिती गठीत!

## सीमाप्रश्नः न्यायालयीन निवाडा लागत नाही तोपर्यंत प्रक्षोभक विधाने टाळा-शाह

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

महाराष्ट्र, कर्नाटक सीमा प्रश्न हा न्यायप्रविष्ठ असून, दोन्ही राज्यांनी सामंजस्याने त्यावर तोडगा काढणे उचित ठरेल. जोपर्यंत न्यायालयीन निवाडा लागत नाही तोपर्यंत प्रक्षोभक विधाने टाळा, तसेच दोन्ही राज्यांनी सीमाभागावर कोणत्याही प्रकारचा दावा न करण्याचे असे निर्देश केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दोन्ही राज्यांच्या नेत्यांना दिले. या वादावर तोडगा काढण्यासाठी दोन्ही राज्यांचे तीन, तीन अशी सहा मंत्र्यांची समिती चर्चा करणार असल्याची घोषणाही शाह यांनी केली आहे.

सीमा प्रश्नांवरुन गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्रातील वातावरण तप्त बनले आहे.याची दखल घेत शाह यांनी बुधवारी दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना बैठकीसाठी पाचारण केले होते.त्यानुसार संसदेतील लायब्ररीमध्ये सायंकाळी शाह यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली.महाराष्ट्रातर्फे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर कर्नाटकतर्फे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि राज्याचे गृहमंत्री उपस्थित होते. ही बैठक सुमारे अर्धा तास चालली. या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना अमित शाह यांनी सीमाप्रश्नांबाबत दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसमवेत सकारात्मक चर्चा झाली आहे.या बैठकीत हा वाद न्यायप्रविष्ठ असल्याने जोपर्यंत त्याचा निकाल लागेपर्यंत दोन्ही राज्यांनी सीमाभागावर कोणत्याही प्रकारचा दावा न करण्याचे निर्देश दिल्याचे शाह यानी सांगितले.याशिवाय हा प्रश्न सोडविण्यासाठी दोन्ही राज्यांचे तीन,तीन अशा सहा मंत्र्यांची समिती यावर चर्चा करणार आहे.तसेच सध्या सुरु असलेला वादाला सोशल मिडियावरुन ज्यांनी खतपाणी घातले त्यांचा शोध घेण्यासाठी सिनिअर आयपीएस अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले.बोम्मई यांनी आपल्या बनावट अकाऊंटवरुन हे विधान करण्यात आले असल्याचेही या बैठकीत सांगितले.



> सीमाप्रश्नावर केंद्राने प्रथमच हस्तक्षेप केला आहे. हे अत्यंत चांगले झाले.सीमा राज्यातील जनतेला त्रास होणार नाही याची काळजी दोन्ही राज्यांच्या प्रमुखांनी घेण्याचे मान्य केलेले आहे.सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण आहे.तेथे आम्ही महाराष्ट्राच्या भूमिकेवर ठाम राहणार आहोत.त्यात कदापि बदल केला जाणार नाही.
>
> **- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

### विरोधकांना आवाहन

**दरम्यान,सीमाप्रश्नांवर दोन्ही राज्यांमधील विरोधकांनी लोकशाहीच्या मार्गाने प्रश्न सुटण्यासाठी राज्य सरकारना प्रयत्न करावेत,असे आवाहनही शाह यांनी केले.**

# राज्यपाल कोश्यारींना दणका!

## नियुक्तीवर सर्वोच्च न्यायालायचे महत्त्वपूर्ण निर्देश

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तीबाबतची सुनावणी आज सर्वोच्च न्यायालयात पार पडली. यावर सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्देश दिले आहेत. मागील अनेक दिवसांपासून राज्यपाल नियुक्त आमदारांचा मुद्दा गुंतागुंतीचा झाला आहे. त्यावर आज सुनावणी झाली असून सरकारच्या वतीने तुषार मेहता यांनी युक्तिवाद केला.

सर्वोच्च न्यायालयाने राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नियुक्तीसाठी ७ फेब्रुवारीपर्यंत स्थगिती दिली आहे. त्यामुळे ७ फेब्रुवारीपर्यंत आमदार नियुक्तीचा कोणताही निर्णय घेता येणार नाही. मागील दोन वर्षांपासून राज्यपाल नियुक्त आमदारांची नियुक्ती रखडली आहे. आधीच्या सरकारने आमदारांची एक यादी राज्यपालांकडे पाठवली होती. मात्र यावर राज्यपालांनी निर्णय घेतला नव्हता. त्यातच सरकार बदललं आणि नव्याने आमदारांची यादी पाठविण्यात आली. यावरून आता कायदेशीर पेच तयार झाला आहे.



**तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेली आमदारांची यादी सरकार बदलल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी राज्यपालांकडून परत मागवली होती. त्यावर इंटर्व्हेशन याचिका दाखल करण्यात आली होती. ही घटनाबाह्य कृती आहे. राज्यपालांनी घटनेमध्ये राहून काम केलं पाहिजे. मात्र राज्यपालांनी घटनेची पायमल्ली केली. त्यामुळे आम्हाला स्थगिती मिळाल्याचे सुनील मोदी यांनी म्हटलं.**

सुप्रिम कोर्टात आज झालेल्या सुनावणीबाबत याचिकाकर्ते सुनील मोदी म्हणाले की, आज सुनावणीत मुळ याचिकाकर्त्यांनी विड्रॉचा अर्ज दिला होता. तर माझा इंटर्वेशन अर्ज असल्यामुळे युक्तीवाद झाला. युक्तावादात सरकारच्या वतीने तुषार मेहता आणि याचिकाकर्ते दवे तर आमच्याकडून नायडू युक्तीवादासाठी उभे राहिले. त्यावर न्यायालयाने याचिकाकर्त्यांना विचारलं की, तुम्ही पीआएल केली आहे. मग विड्रॉ का करता, तसेच आता विड्रॉ करता येणार नाही. तर माझे इंट्रव्हेशन मान्य झालं असून ७ फेब्रुवारीपर्यंत आमदार नियुक्तीबाबत स्थगिती देण्यात आली आहे.

तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिलेली आमदारांची यादी सरकार बदलल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी राज्यपालांकडून परत मागवली होती. त्यावर इंटर्व्हेशन याचिका दाखल करण्यात आली होती. ही घटनाबाह्य कृती आहे. राज्यपालांनी घटनेमध्ये राहून काम केलं पाहिजे. मात्र राज्यपालांनी घटनेची पायमल्ली केली. त्यामुळे आम्हाला स्थगिती मिळाल्याचे सुनील मोदी यांनी म्हटलं.

दरम्यान कोर्टाने म्हटलं की, राज्यपालपद हे घटनात्मक पद आहे. राज्यपालांनी घटनात्मक पेच निर्माण होईल, अशी कृती करणे योग्य नाही, असंही न्यायालयाने नमूद केल्याचं मोदी यांनी सांगितलं.

# मंत्रिमंडळ विस्ताराची चर्चा मंदावली!

## हिवाळी अधिवेशनात 21 विधेयके मांडली जाणार

। नागपूर । महाईन्यूज ।

विधिमंडळाच्या नागपूर हिवाळी अधिवेशनाचे बिगुल वाजले असून मंगळवारी मुंबईत झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत दोन आठवड्याचा (१० दिवस) कार्यकाळही निश्चित करण्यात आला आहे. अधिवेशनात २१ विधेयके मांडली जाणार असून त्यावर चर्चा अपेक्षित आहे. दरम्यान, विधिमंडळ इमारत परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. विधिमंडळ सचिवालयाने अधिवेशनाच्या कामकाजासंदर्भात काढलेल्या तात्पुरत्या दिनदर्शिकेनुसार पहिल्या दिवशी (१९ डिसें.) दोन्ही सभागृहात अध्यादेश पटलावर ठेवणे, पुरवणी मागण्या सादर करणे, मंगळवार, बुधवारी शासकीय कामकाज, गुरवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा, शुक्रवारी पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान आणि पुरवणी नियोजन विधेयक अशा स्वरुपाच्या कामकाजाचे नियोजन



करण्यात आले आहे. मात्र, सीमावाद, थोर पुरुषांबाबत सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी केलेली आक्षेपार्ह वक्तव्ये पाहता पहिले दोन दिवस या मुद्यांवर दोन्ही सभागृहात वादंग होण्याची शक्यता आहे.

विधानभवनात सोमवारपासून वर्दळ वाढली आहे. प्रवेशद्वारावर सुरक्षा सैनिक तैनात करण्यात आले असून ओळखपत्र तपासूनच आत सोडले जात आहे. विधानभवनाकडे जाणाऱ्या मार्गावर सुरक्षा कठडे लावण्यात आले आहे. रविवारी सर्व मंत्री नागपुरात दाखल होतील.

हिवाळी अधिवेशनापूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार केला जाईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूरमध्ये दिवाळीत केली होती.

# सीमाप्रश्न: तारखांवर तारखा!

## राम मंदिराचा प्रश्न सुटू शकतो, पण सीमाप्रश्न का नाही - संजय राऊत

। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।

महाराष्ट्र - कर्नाटक सीमावादावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आज दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार आहेत. या भेटीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. जर न्यायालयात राम मंदिराचा प्रश्न सुटू शकतो, किंवा



सरकारच्या हिताचे जे इतर काही प्रश्न सुटू शकतात पण सीमा प्रश्न किंवा महाराष्ट्रातील बेकायदेशीर घटनाबाह्य सरकारचा विषय असेल त्यावर तारखांवर तारखा पडत आहेत, यामुळे लोकांच्या मनात शंका निर्माण झाली आहे, अशा शब्दात खासदार संजय राऊत यांनी केंद्र सरकार थेट टीकास्त्र डागले आहेत. आज केंद्रीय गृहमंत्री दोन्ही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना घेऊन बैठक घेणार असलीत आणि त्यातून काही निघणार असेल तर त्याचं स्वागत असल्याचेही राऊत म्हणाले. राऊत आज सकाळी माध्यमांशी बोलत होते.

न्यायालयात अनेक प्रश्न प्रलंबित आहेत म्हणून केंद्राने त्यावर बोलायच नाही का? हस्तक्षेप करायचा नाही का? केंद्र सरकार राम मंदिराचा प्रश्न सलग सुनावणी लावून सोडवू शकतो कारण तो राजकीय प्रश्न बनला पण 20 ते 25 लाख मराठी बांधवांच्या प्रश्नावर न्यायालय तारखांवर तारखा देत आहे, असंही राऊत म्हणाले. गेल्या 70 वर्षांपासून त्या भागात मराठी बांधवांना अन्याय होत आहे. नुसता अन्याय नाही तर चिरडल जात आहे, भरडल जात आहे त्यामुळे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी त्यासंदर्भात निर्णय घ्यावा असे आवाहन राऊतांनी केले आहे.

### गृहमंत्र्यांच्या सासरवाडीला सीमाप्रश्नाचे चटके

**गृहमंत्री महाराष्ट्राचे जावई आहेत, त्यांची पत्नी कोल्हापूरच्या आहेत, त्याचे सर्वात जास्त चटके कोल्हापूरला बसतात, सर्वात जास्त संघर्ष हा कोल्हापूरात होतो कारण कोल्हापूरात महाराष्ट्र - कर्नाटक सीमा आहे. त्यामुळे त्यांना याबाबत जास्त माहिती आहे, असा टोलाही राऊतांनी लगावला आहे. त्यामुळे आजच्या बैठकीतून आता काय निर्णय होणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. दरम्यान या सीमावादानंतर आता महाराष्ट्र सरकारकडूनही सीमाभागातील गावांमध्ये सर्व सुविधा आणि योजना पोहचवण्याच्या निर्णयांना वेग आला आहे.**

---

# भारत-चीन संघर्षाबाबत अमेरिकेकडून भारताला पाठिंबा?

## "भारताच्या प्रयत्नांना आमचा पूर्ण पाठिंबा"

। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

अरुणाचल प्रदेशातील तवांग सेक्टरमध्ये 9 डिसेंबरला भारतीय आणि चीनी सैनिकांमध्ये झालेल्या चकमकीनंतर आता अमेरिकेकडून वक्तव्य आले आहे. अमेरिकेचे हे वक्तव्य भारतासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. याचे कारण म्हणजे जेव्हा भारताने युक्रेनच्या मुद्द्यावर रशियावर टीका करण्यास नकार दिला होता. तेव्हा अमेरिकेकडून नाराजी व्यक्त करण्यात आली होती. तर, चीनच्या मुद्द्यावर भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनीही भारताला पाश्चात्य देशांचा पाठिंबा मिळाला नसल्याचे स्पष्ट केले होते.

व्हाईट हाऊसकडून अरुणाचल प्रदेशच्या तवांगमध्ये भारतीय आणि चिनी सैन्यांमध्ये नुकत्याच झालेल्या चकमकीवर भाष्य केलंय, आणि म्हटले की, हा तणाव लवकरच निवळला हे ऐकून आनंद झाला. व्हाईट हाऊसचे प्रेस सचिव करीन जीन-पियरे यांनी सांगितले की, "अमेरिका या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे" आम्हाला हे पाहून आनंद होत आहे की दोन्ही देश संघर्षापासून त्वरीत दूर झाले आहेत."



संयुक्त राष्ट्राचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी भारत-चीन सीमेवर तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे. यूएनचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांच्या प्रवक्त्याने सांगितले की, "आम्ही हा तणाव कमी करण्याचे आवाहन करतो, तसेच हा तणाव वाढणार नाही याची काळजी घेतो."

### "भारताच्या प्रयत्नांना आमचा पूर्ण पाठिंबा"

**पेंटागॉनचे प्रेस सेक्रेटरी पॅट रायडर पुढे म्हणाले, "आम्ही आमच्या मित्रदेशांची सुरक्षा सुनिश्चित करण्याच्या आमच्या वचनबद्धतेवर ठाम आहोत. भारताच्या परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याच्या प्रयत्नांना आमचा पूर्ण पाठिंबा आहे." अमेरिकेच्या संरक्षण विभागाने म्हटले की, भारत-चीन सीमेवर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) जे काही घडत आहे, त्यावर बारीक लक्ष ठेवून आहे. पेंटागॉनचे प्रेस सेक्रेटरी पॅट रायडर म्हणाले, "पीपल्स रिपब्लिक ऑफ चायनाकडून (पीआरसी) एलएसीवर सैन्य जमा करणे आणि लष्करी पायाभूत सुविधा निर्माण करणे सुरू ठेवत आहे."**

### भारतीय सीमेत घुसण्याचा प्रयत्न

**9 डिसेंबर रोजी भारतीय सैन्याच्या तीन तुकड्यांनी भारतीय सैनिकांवर हल्ला करण्यासाठी 300 हून अधिक चीनी सैनिकांना चोख प्रत्युत्तर दिले, भारतीय जवानांनी त्यांना आधीच रोखले आणि त्यानंतर दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये चकमक झाली. त्यानंतर चिनी सैनिकांना माघार घ्यावी लागली. यावर काल भारतीय संरक्षण मंत्री म्हणाले की, या संघर्षात काही भारतीय सैनिकांना किरकोळ दुखापत झाली आहे आणि त्यात एकही सैनिक मारला गेला नाही. त्याचवेळी सीमेवरील परिस्थिती स्थिर असल्याचे चीनने सांगितले.**

---

# RBI चे माजी गव्हर्नर रघुराम राजन राहुल गांधींसोबत भारत जोडो यात्रेत सहभागी!

। नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

सध्या राजस्थानमध्ये सुरु आहे. या यात्रेत रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन सहभागी झाले आहेत. सवाई माधोपुर येथील भदौती इथे रघुराम राजन हे राहुल गांधी यांच्यासोबत यात्रेत सहभागी झाले. यात्रेतील त्यांच्या सहभागानंतर विविध चर्चांना उधाण आले आहेत.



रघुराम राजन हे राहुल गांधी यांच्याबरोबर यात्रेत सहभागी झाल्याचा फोटो काँग्रेसने सोशल मीडीयावर व्हायरल केला आहे. द्वेषाच्या विरोधात देशाला एकत्र आणण्यासाठी लोकांची संख्या वाढत आहे. ही वाढती संख्या आपण यशस्वी होऊ हे दर्शवत असल्याचं काँग्रेसनं म्हटलं आहे. सध्या राहुल गांधा यांची भारत जोडो यात्रा ही राजस्थानमध्ये आली आहे. राजस्थानमधील भदौती इथे रघुराम राजन आज राहुल गांधी यांच्यासोबत यात्रेत सहभागी झाले होते. दरम्यान, काँग्रेसची ही पदयात्रा आज राजस्थानमधील बिलोना कलान मुक्कामी असणार आहे. काही दिवसांपूर्वीच रघुराम राजन यांनी केंद्र सरकारच्या अनेक धोरणांवर टीका केली होती. सध्या अर्थव्यवस्थेची स्थिती चांगली नाही, परंतु तरीही सरकार सत्य स्वीकारण्यास तयार नाही आणि या प्रश्नाचे गांभीर्य सातत्याने कमी करत असल्याचे राजन म्हणाले होते. इतकेच नव्हे तर आर्थिक मंदीच्या समस्येवर मात करण्यासाठी मोदी सरकारला ही समस्या मान्य करावी लागेल कारण ती लपवून ठेवल्याने परिस्थिती सुधारणार नाही असेही ते म्हणाले होते.

---

# बिल्किस बानो खटल्यातील दोषींच्या सुटकेला आव्हान

## न्या. बेला त्रिवेदी यांची सुनावणीतून माघार

**नवी दिल्ली :** बिल्किस बानो सामूहिक बलात्कार प्रकरणातील ११ दोषींना माफ करण्याच्या गुजरात सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील सुनावणीतून न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी माघार घेतली आहे. नवीन खंडपीठ स्थापण्यात येईल आणि त्यानंतर या प्रकरणाची सुनावणी होईल, असे सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्पष्ट केले.

न्यायमूर्ती अजय रस्तोगी आणि बेला त्रिवेदी यांचे खंडपीठ मंगळवारच्या कामकाजासाठी बसले असता, न्यायमूर्ती रस्तोगी यांनी स्पष्ट केले, की, त्यांच्या सहकारी न्यायाधीश त्यांच्या समोर या प्रकरणाची सुनावणी करू इच्छित नाहीत. न्या. त्रिवेदी यांनी यामागचे कारण मात्र नमूद केले नाही.

# रश्मिका मंदानाला फटका

गेल्या काही वर्षात अनेक दाक्षिणात्य कलाकारांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं आहे. दक्षिणात्य चित्रपटांप्रमाणेच हिंदी चित्रपटातही आपल्या दमदार अभिनयाची छाप पाडत त्यांनी संपूर्ण देशाला वेड लावलं. यामध्ये काहींना यश आलं तर काहींना अपयश आलं. त्यातलीच एक अभिनेत्री म्हणजे रश्मिका मंदाना. बॉलिवूडमधील तिचा पहिला चित्रपट अपयशी ठरल्याने दुसऱ्या चित्रपटाच्या बाबतीत तिला मोठा फटका बसला आहे.

रश्मिकाने या वर्षाच्या सुरुवातीला ‘पुष्पा’ या चित्रपटाच्या माध्यमातून प्रेक्षकांना भुरळ घातली. दक्षिणात्य चित्रपटसृष्टीत लोकप्रियता मिळवल्यावर यावर्षी तिने बॉलिवूडमध्ये पाऊल टाकलं. अमिताभ बच्चन यांची प्रमुख भूमिका असणाऱ्या ‘गुडबाय’ या चित्रपटातून तिने बॉलिवूडमध्ये एन्ट्री केली. परंतु हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई करू शकला नाही. याचाच परिणाम म्हणून तिच्या पुढच्या बॉलिवूड चित्रपटाच्या बाबतीत त्यांनी मोठा निर्णय घेतला आहे. लवकरच रश्मिका ‘मिशन मजनू’ या बॉलिवूड चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. तर तिच्याबरोबर अभिनेता सिद्धार्थ मल्होत्राही मुख्य भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाच्या घोषणेपासूनच याची तिच्या चाहत्यांमध्ये चर्चा होती. आधी हा चित्रपट मोठ्या पडद्यावर प्रदर्शित करण्याचा निर्मात्यांचा विचार होता. मात्र रश्मिका च्या पहिल्या बॉलिवूड चित्रपटाला मिळालेला प्रतिसाद बघून आता यात बदल केला गेला आहे.

‘मिशन मजनू’ हा रश्मिकाचा आगामी चित्रपट चित्रपटगृहात नाही तर थेट ओटीटीवर प्रदर्शित करण्याचा निर्णय निर्मात्यांनी घेतला आहे. या चित्रपटाच्या निर्मात्यांनी ‘नेटफ्लिक्स’ची करार करून ‘मिशन मजनू’ हा चित्रपट ते ‘नेटफ्लिक्स’वर प्रदर्शित करणार आहेत. हा चित्रपट 20 जानेवारी रोजी ओटीटी वरून प्रेक्षकांच्या भेटीला येईल.





# कोण आहे जान्हवीचा मिस्ट्री बॉय?

बॉलिवूड अभिनेत्री जान्हवी कपूर नेहमीच चर्चेत असते. जान्हवी तिच्या फॅशन सेन्समुळेच नाही तर तिच्या व्हॅकेशन्समुळे देखील लॅमलाईटमध्ये असते. पण आता चर्चा होत आहे ती वेगळीच, आतापर्यंत जान्हवीचे नाव अनेक प्रसिद्ध व्यक्तींसोबत जोडले गेले आहे. पण जान्हवी तिच्या नात्याबद्दल कधीच उघडपणे बोलली नाही. सध्या जान्हवीचा एक व्हिडिओ व्हायरल होत आहे ज्यामध्ये ती तिच्या मिस्ट्री बॉयचा हात धरुन पार्टीत एन्ट्री करताना दिसत आहे. जसा हा व्हिडीओ समोर आला तसं जान्हवीच्या रिलेशनशीपच्या चर्चा रंगलेली पहायला मिळाली

जान्हवी कपूरने नुकतीच एका पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावली होती. पण या अवॉर्ड नाईटमध्ये जान्हवी एकटी नाही तर तिचा खास मित्र ओरहान अवत्रामणीसोबत पोहोचली होती. जान्हवीने ओरहानसोबत पापाराझींनाही अनेक पोझ दिल्या. एवढेच नाही तर जान्हवी ओरहानचा हात धरत सोहळ्यात एन्ट्री करताना दिसली. जान्हवीची ओरहानसोबत खास बाँडिंग पाहून हे दोघे एकमेकांच्या डेट करत आहे की काय? असा सवाल आता सर्व करू लागलेयत.

# 'बेशरम रंग' चित्रपटासाठीचं मानधन चर्चेत...



बॉलिवूडवरिल बॉयकॉटचं सावट कमी झाल आहे असं वाटतं असतांनाचं शाहरुख खानच्या 'पठाण' चित्रपटाने पुन्हा बॉयकॉटच्या ट्रेंड जोर धरु लागला आहे. काही दिवसांपुर्वी या चित्रपटाचा टिझर रिलिज झाला आणि आता या चित्रपटातील पहिलं गाणं बेशरम रंग हे रिलीज होतात गाण्याला जोरदार विरोध होतं आहे. त्या गाणयातील दिपिकाचे कपडे त्याचा रंग आणि तिची डान्स स्टेप यावरुन जोरदार राडा सुरु आहे.

जेव्हा चित्रपटाचं पोस्टर रिलिज झालं तेव्हा बॉलीवूडमधील सर्वात लोकप्रिय जोडी शाहरुख खान आणि दीपिका पदुकोण यांची पुन्हा केमेस्ट्री पहायला मिळणार होती. त्यामूळे हा चित्रपट हिट होणार असं वाटलं होतं मात्र या गाण्याला होणारा विरोध आणि बॉयकॉट ट्रेंण्ड यामूळे चित्रपटाच्या कलेक्शनवर याचा परिणाम दिसणार आहे. निर्माता आदित्य चोप्राने 'पठाण'च्या बजेटवर पैसे खर्च करण्यात कोणतीही कसर सोडली नाही. 'पठाण' ची स्टारकास्ट आणि दिग्दर्शकाची फी तुम्हाला आश्चर्यचकित करेल. त्यातच चित्रपटासाठी कलाकारांचं मानधन हा सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय आहे. 'पठाण या हाय- ॲक्शन थ्रिलर चित्रपटासाठी चित्रपट निर्मात्याला 6 कोटी रुपये मानधन मिळाल्याची माहिती आहे.

चित्रपटात मुख्य भूमिकेत असलेल्या शाहरुख खानला या चित्रपटासाठी भरघोस मानधन मिळत असल्याची माहिती आहे. या चित्रपटासाठी, शाहरुखला मानधन म्हणून 100 कोटी रुपये दिले जातात आणि तो नफ्यातही त्याचा हिस्सा घेत असतो. KoiMoi मधील एका अहवालानुसार, शाहरुख खानला 'पठाण मधील त्याच्या मुख्य भूमिकेसाठी 100 कोटी रुपये मानधन देण्यात आले आहे, ज्यामुळे तो सध्या देशातील सर्वाधिक मानधन घेतलेल्या अभिनेत्यांपैकी एक बनला आहे.

# रंग माझा वेगळा' मध्ये नवा ट्वीस्ट पण नेटकऱ्यांनी काढली अक्कल

स्टार प्रवाह वाहिनीवरील 'रंग माझा वेगळा' ही मालिका बरेच दिवस नंबर वन वर होती पण आता अचानक मालिकेचा टीआरी घसरायला लागला अन् लगेच मालिकावाल्यांना जाग आली....असं आम्ही नाही म्हणत आहोत बरं का..हे म्हणत आहेत मायबाप प्रेक्षक. ज्यांनी या मालिकेला डोक्यावर उचलून धरलं होतं आणि आता तेच या मालिकेला वैतागले आहेत. कारण गेले अनेक महिने मालिका कार्तिक आणि दीपा यांच्यातील गैरसमजावरच ओढली जात आहे.

आता कार्तिक-दीपामधील गैरसमज आणि त्यांच्यातील दुराव्याचा लोकांना कंटाळा आला आहे. आणि याचा परिणाम म्हणजे मालिकेच्या टीआरपी मध्ये कमालीची घसरण झालेली दिसून आली.

आता एक नवा प्रोमो मालिकेचा समोर येत आहे, ज्यात कार्तिकसमोर गेल्या अनेक दिवसांपासून लपलेलं सत्य समोर येताना दिसत आहे. प्रोमो पाहिल्यावर मालिकेचा चाहता वर्ग मात्र भलताच खुशीत आहे पण काही नेटकऱ्यांनी मात्र मालिकावाल्यांची खिल्ली उडवलेली आहे. इतक्या उशीरानं निर्मात्या-दिग्दर्शकांना शहाणपण सुचलं का



असा सवाल करत नेटकरी नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. प्रोमोमध्ये दिसत आहे की कार्तिकला आता कळणार आहे ते त्याच्या फर्टीलिटी टेस्टच्या रीपोर्टमध्ये घोळ झाला होता. रिपोर्ट बदलल्यानं कार्तिकसमोर आलं होतं की तो कधीच बाबा बनू शकत नाही. पण ते सत्य नसून तो बाबा बनू शकतो हे सत्य त्याला आता अनेक वर्षांनी कळणार आहे. आणि दीपानं जन्म दिलेल्या दोन जुळ्या मुलींचा तोच बाबा आहे हे देखील त्याला समजणार आहे.

मालिकेच्या नवीन प्रोमोवर टीका करताना लोक म्हणताना दिसत आहेत की,'सत्य सांगितलं पण इतक्या उशीरा. अजून काही वर्ष थांबले असतात तरी चाललं असतं'. तर आणखी एका नेटकऱ्यानं लिहिलं आहे की,'जेव्हा मालिकेचा टीआरपी खाली गेला तेव्हा यांना शहाणपण सुचलं'. आणखी एका नेटकऱ्यानं लिहिलं आहे,'आता अक्कल आली का?

# शफालीचे अर्धशतक व्यर्थ!

## ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या मालिकेत भारतीय महिला संघाचा दुसरा पराभव

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

भारत आणि ऑस्ट्रेलिया महिला क्रिकेट संघ यांच्यातील पाच सामन्यांच्या टी२० आंतरराष्ट्रीय मालिकेतील तिसरा सामना बुधवारी (१४ डिसेंबर) मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर खेळला गेला. या सामन्यात टीम इंडियाचा २१ धावांनी पराभव झाला. या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ऑस्ट्रेलियाने २० षटकात ८ गडी गमावत १७२ धावा केल्या. प्रत्युत्तरात टीम इंडियाला २० षटकांत ७ गडी गमावत १५१ धावांपर्यंत मजल मारू शकला. पाच सामन्यांच्या या मालिकेत ऑस्ट्रेलियन संघ २-१ ने पुढे गेला आहे. चौथा सामना याच मैदानावर १७ डिसेंबर रोजी होणार आहे.

भारताची सलामीवीर शेफाली वर्माने शानदार फलंदाजी करताना अर्धशतक झळकावले. ४१ चेंडूत ५२ धावा करून ती बाद झाली. शफालीने या खेळीत सहा चौकार आणि तीन षटकार मारले. मात्र, शेफालीचे हे अर्धशतक व्यर्थ गेले आणि टीम इंडियाला विजय मिळवता आला नाही. हरमनप्रीतला मोठी खेळी खेळता आली नाही



### मंधाना आणि जेमिमाची बॅट चालली नाही

**भारताला पहिला धक्का तिसऱ्याच षटकात बसला. स्मृती मंधाना १० चेंडूत १ धावा काढून बाद झाली. त्याला सदरलँडने डार्सी ब्राउनकरवी झेलबाद केले. मंधानानंतर जेमिमा रॉड्रिग्ज पाचव्या षटकात तंबूत परतली. जेमिमा ११ चेंडूत १६ धावा करून बाद झाली. त्याने तीन चौकार मारले. त्याला डार्सी ब्राउनने एलबीडब्ल्यू केले.**

### ॲलिस पॅरी आणि ग्रेस हॅरिस यांनी तुफानी खेळी खेळली

**ऑस्ट्रेलियाच्या डावाबद्दल बोलायचे झाले तर संघाचे फक्त तीन फलंदाज दुहेरी आकडा पार करू शकले. त्याच्यासाठी ॲलिस पॅरीने सर्वाधिक ७५ धावा केल्या. त्याने ४७ चेंडूंच्या खेळीत नऊ चौकार आणि तीन षटकार मारले. ग्रेस हॅरिसने १८ चेंडूत ४१ धावांची खेळी खेळली. त्याने चार चौकार आणि तीन षटकार मारले. त्याचवेळी, बेथ मुनीने २२ चेंडूत ३० धावा केल्या.**

शफालीनंतर देविका वैद्यने एक धाव घेत गार्डनरकरवी झेलबाद केले. यष्टीरक्षक फलंदाज रिचा घोषने एक धाव घेत गार्डनरच्या गोलंदाजीवर सदरलँडचा झेल घेतला. शेवटच्या षटकात कर्णधार हरमनप्रीत कौरकडून झटपट धावा अपेक्षित होत्या, पण ती १७व्या षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर बाद झाली. हरमनप्रीतने सदरलँडच्या हाती मेगन सटकरवी झेलबाद केले.

# मेस्सी-अल्वारेझची किमया!

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

### अर्जेंटिना सहाव्यांदा फायनलमध्ये



मेस्सीचे ड्रीबलिंग आणि अल्वारेझचे फिनिशिंग या चमत्काराच्या जोरावर आज अर्जेंटिनाने विश्वकरंडक फुटबॉलच्या अंतिम फेरीत धडक मारली. त्यांनी क्रोएशियाचा 3-0 असा दणदणीत पराभव केला. निवृत्तीपूर्वी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी सारे काही झोकून खेळणारा मेस्सी आज चाहत्यांना मैदानावर दिसला. या विजयासह अर्जेंटिनाच्या संघाने आठ वर्षांनंतर अंतिम फेरीतील आपले स्थान पक्के केले आहे. विश्वचषकाच्या इतिहासात अर्जेंटिना सहाव्यांदा अंतिम फेरीत खेळणार आहे.

उपांत्य फेरीच्या पहिल्या सामन्यात आक्रमण हेच धोरण ठेवत मेस्सीच्या अर्जेंटिनाने उपांत्य फेरीत सुरुवात केली. मेस्सीने आघाडीवर रहात आपल्या ड्रीबलिंगद्वारे क्रोएशियाच्या गोलजाळ्याच्या दिशेने धडका देण्यास सुरुवात केली. हा दबाव क्रोएशियाला सहन होत नव्हता आणि त्यातूनच गोलरक्षक लिव्हाकोविक याने गोल जाळ्याच्या दिशेने चेंडूसह निघालेल्या अर्जेंटिनाच्या अल्वारेझला पेनल्टी एरियात चुकीच्या पद्धतीने रोखले. पंचांनी तत्काळ अर्जेंटिनाला पेनल्टी बहाल केली. ही संधी मेस्सीने साधली आणि 33 व्या मिनिटाला अर्जेंटिनाने 1-0 अशी भक्कम आघाडी घेतली.

मेस्सीचा विश्वकरंडकातील हा अकरावा गोल होता. त्याने या स्पर्धेत आधी दिएगो मॅरेडोना आणि आज बॅटिस्टुटा यांचा दहा गोलांचा विक्रम देशाकडून खेळताना मागे टाकला आहे.

# अर्जुननं ठोकलं शतक!

## मुंबई इंडियन्स चूक सुधारणार का?

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरला रणजी ट्रॉफी 2022 मध्ये पदार्पण करण्याची संधी मिळाली आहे. अर्जुनने 13 डिसेंबरला गोवा संघासाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले. अर्जुनने ही संधी सुवर्ण संधी म्हणून घेतली आणि दुसऱ्या दिवशी त्याने शानदार शतक ठोकलं. त्याच वेळी इंडियन प्रीमियर लीगचा 16 वा हंगाम लवकरच सुरू होणार आहे. रणजी ट्रॉफीतील कामगिरी पाहून आगामी आयपीएलमध्ये तो मुंबई इंडियन्सकडून खेळताणा दिसणार का ?

अर्जुन तेंडुलकर यापूर्वी मुंबई संघाचा भाग होता. मात्र मुंबईकडून त्याला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये संधी देण्यात आली नाही. त्यानंतर त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडे बदलीसाठी अपील केले. आता




मुंबई सोडून अर्जुन गोव्याच्या संघात खेळत आहे. गोव्याविरुद्ध राजस्थान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गोव्याकडून खेळणाऱ्या अर्जुन तेंडुलकरने राजस्थानविरूद्ध पहिल्या डावात 178 चेंडूत नाबाद शतकी खेळी केली.

अर्जुन 2020 पासून मुंबई इंडियन्सचा एक भाग आहे. पहिल्या सत्रात तो 20 लाखांच्या मूळ किंमतीसह संघात सामील झाला होता.

त्याच वेळी दुसऱ्यांदा त्याला मुंबईने 30 लाख रुपयांमध्ये आपल्या कॅम्पमध्ये समाविष्ट केले. मात्र आतापर्यंत मुंबईने त्याला खेळण्याची संधी दिली नाही. मात्र त्याची गोव्यातील कामगिरी पाहून आगामी आयपीएलमध्ये त्याला मैदानात उतरवले जाऊ शकते, असे म्हणता येईल. 15 नोव्हेंबर रोजी फ्रेंचायझीने जाहीर केलेल्या यादीत या खेळाडूला कायम ठेवण्याचा निर्णय मुंबईने घेतला होता.

**अर्जुन तेंडुलकर यापूर्वी मुंबई संघाचा भाग होता. मात्र मुंबईकडून त्याला प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये संधी देण्यात आली नाही. त्यानंतर त्यांनी मुंबई क्रिकेट असोसिएशनकडे बदलीसाठी अपील केले. आता मुंबई सोडून अर्जुन गोव्याच्या संघात खेळत आहे. गोव्याविरुद्ध राजस्थान संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. गोव्याकडून खेळणाऱ्या अर्जुन तेंडुलकरने राजस्थानविरूद्ध पहिल्या डावात 178 चेंडूत नाबाद शतकी खेळी केली.**

# मुलांमध्ये विजेता अन् मुलींमध्ये महाराष्ट्रास उपविजेतेपद!

नाशिक।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




जिल्हा तलवारबाजी असोसिएशन आणि महाराष्ट्र राज्य तलवारबाजी असोसिएशन यांच्यातर्फे सतराव्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धेचा समारोप झाला. मुलांच्या गटात महाराष्ट्राने विजेतेपद पटकावले, तर मुलींच्या गटात मणिपूरने विजेतेपद पटकावले आहे. या गटातून महाराष्ट्राला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.फेन्सिंग फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अखिल भारतीय मराठा महासंघ क्रीडा विभागाच्या सहकार्याने (स्व.) मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल येथे कॅडेट गटाच्या १९ वर्षे मुलांची आणि मुलींची सतराव्या राष्ट्रीय तलवारबाजी स्पर्धा पार पडली. स्पर्धेत यजमान महाराष्ट्राच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून मुलांमध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. मुलींमध्ये महाराष्ट्राच्या संघाला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले.

मुलींच्या गटातून मणिपूरच्या खेळाडूंनी चांगला खेळ करून ३८ गुणांसह विजेतेपद मिळविले. मुलांच्या सॅबर प्रकारात महाराष्ट्राच्या निखिल वाघने पहिल्या सामन्यापासूनच आक्रमक खेळ करून सुवर्णपदक पटकावले. तर श्रेयश जाधवने कास्यपदक मिळविले. या दोन खेळाडूंच्या चांगल्या कामगिरीमुळे महाराष्ट्राला मुलांमध्ये सर्वसाधारण विजेतेपद मिळविता आले. मुलींमध्ये फॉईल प्रकारात महाराष्ट्राच्या वैदेही लोहियाने अंतिम लढतीत मणिपूरच्या सोनिया देवी वैकहोमला चांगली लढत दिली.

परंतु शेवटच्या दोन मिनिटात सोनिया देवीने तीन गुण वसूल करून अंतिम सामना जिंकताना विजेतेपद मिळविले. त्यामुळे वैदेहीला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले. मुलींच्या ईपी प्रकारात महाराष्ट्राच्या जान्हवी जाधवलाही अंतिम लढतीत मणिपूरच्या देवी सईकहोम नेलकीरोजने पराभूत केल्यामुळे तिलाही रौप्य पदक मिळाले. याच प्रकारात महाराष्ट्राच्या अनुजा लाडने उपांत्य फेरी गाठून चांगली कामगिरी करत कांस्यपदक मिळविले.